# नाशिक व्हावे शिक्षणाचे हब : मंत्री भुजबळ

## के. के. वाघ वाघ शिक्षण संस्थेत सत्कार

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २२ : सगळीकडे मोठ्या प्रमाणात नवतंत्रज्ञानाकडे वाटचाल सुरू आहे. यात आपल्यालादेखील उतरावे लागेल. स्पर्धेला तोंड देण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत, यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. नाशिक हे शिक्षणाचे हब निर्माण व्हायला हवे, कर्मवीरांच्या मोठेपणामुळे के. के. वाघसारख्या इतर शिक्षण संस्था उभा राहिल्या. कर्मवीरांनी लावलेल्या रोपट्याचे ५५ वर्षांत वटवृक्षात निर्माण झाले आहे. संस्था विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याबरोबरच जबाबदार नागरिक घडविण्याचे काम करत असल्याचे प्रतिपादन राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.



**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात झालेल्या सत्काराला उत्तर देताना मंत्री छगन भुजबळ. शेजारी आमदार दिलीप बनकर, समीर वाघ, अजिंक्य वाघ आदी.

के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे आयोजित सत्कार, मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आमदार दिलीप बनकर होते. याप्रसंगी माजी आमदार नानासाहेब बोरस्ते, नाना महाले, लासलगाव बाजार समितीचे सभापती डी. के. जगताप, वामन खोसकर, चांगदेवराव होळकर, अजिंक्य वाघ, विलास टर्ले, धनंजय होळकर, सुरेश शेटे, सुरेश भोज आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. ऑनलाइन माध्यमातून राज्यातील अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन व कृषी महाविद्यालयाचे संस्थाचालक व प्राचार्य व पदाधिकारी तसेच शैक्षणिक, सहकार, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील नऊशेहून अधिक मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी केले. प्राचार्य डॉ. भूषण कर्डिले यांनी पाहुण्यांचा परिचय केला. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांनी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, कार्यक्रमाचे अध्यक्ष व उपस्थितांचा सत्कार केला. कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्यानंतर कै. बाळासाहेब वाघ यांनी आदर्शवत काम केलेले आहे. तसेच आजचे सत्कारमूर्ती मंत्री भुजबळ यांनी जिल्ह्यात विकासाची गंगा निर्माण केल्याचे सांगून सरकारमध्ये मार्गदर्शक म्हणून काम करत असल्याचे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून आमदार दिलीप बनकर यांनी सांगितले. स्वाती पवार यांनी सूत्रसंचालन केले.

sakal 23-08-2025